विशेष लेख क्र. २९१

१८ आश्विन १९२८ शके (सायं. ५.३० वा.)
मंगळवार, दि.१० ऑक्टोबर २००६

## साखर कारखाने आता पाणी ही गाळणार

राज्यात या वर्षी विक्रमी साखरेचे उत्पादन अपेक्षित आहे.त्यामुळे सहकारी साखर कारखानदारी स्थिरावण्याची शक्यता आहे. केंद्र शासनाने राज्यातील साखर कारखान्याना मोठे पॅकेज दिले आहे तर काही साखर कारखान्यांना राज्य शासनाने पूर्वहंगामी कर्जास व त्यावरील व्याजास थकहमी देण्यास मान्यता दिली आहे. विक्रमी साखरेच्या उत्पादनास योग्य तो भाव मिळावा यासाठी शासनस्तरावर साखर निर्यातीसाठी परवानगी देण्याबाबत विचार होत आहे. साखर कारखान्यात फक्त साखरेचे उत्पादन न घेता काही उपपदार्थ निर्माण करण्यावरही भर देण्यात येणार आहे. यासंदर्भातील काही धोरणात्मक बाबींचा विचार होत आहे. शासनाने सहकार क्षेत्रावर बसलेली धूळ झटकण्यासाठी सुरुवात केली असल्यामुळे सहकारामध्ये अधिक पारदर्शकता येईल असे वाटते.

ऊसामध्ये १२ टक्के साखर आहे व इतर ८८ टक्के उपपदार्थ आहेत. या पदार्थावर प्रक्रिया करुन त्याच्यापासून वेगवेगळे उत्पादन घेता येईल. त्यामुळे साखर कारखान्यांना या उत्पादनातूनही चांगला पैसा मिळण्याची शक्यता आहे, गरज आहे ती फक्त योग्य व्यवस्थापनाची, कुशल कर्मचाऱ्यांची.

साखर कारखाना चालविण्यासाठी मुबलक पाणी लागते. प्रत्येक ठिकाणी पाण्याची उपलब्धता असेलच असे नाही. काही साखर कारखान्यांना काही किलोमीटरवरुन पाणी आणावे लागते. सातत्याने कमी झालेले पर्जन्यमान अतिउपशामुळे झपाटयाने कमी होत असलेला भूजलस्तर, यामुळे पाण्याची कमी झालेली उपलब्धता हा चिंतेचा विषय झालेला आहे. झपाटयाने होणाऱ्या औद्योगिक प्रगतीतसुद्धा पाणी हा महत्वाचा घटक आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती ही म्हण खऱ्या अर्थाने अंमलात आणण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

त्यामुळे साखर कारखान्यांनी आता जमिनीतील पाणी न उपसता ऊसात असलेले जवळ जवळ ५० ते ६० टक्के पाणी प्रक्रिया करुन वेगळे करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने साखर आयुक्तालय पावले

...२/

उचलत आहे. ऊसातील रसापासून साखर निर्मिती करताना जवळ जवळ ५० ते ६० टक्के पाणी निर्माण होते. हे पाणी वाफेच्या स्वरुपात रसापासून वेगवेगळे केले जाते, त्या वाफेचे पाण्यात रुपांतर करण्यासाठी कुंडेन्सेट कुर्निग सिस्टीम बसविल्यास शुध्द पाणी तयार होते. कारखान्यात तयार होणाऱ्या पाण्यामध्ये कुठलेही घातक क्षार नसतील. या पाणी निर्मितीमुळे कारखान्याला बाहेरुन पाणी घ्यावे लागणार नाही. त्यामुळे पाण्याचे बील, वीजबील, देखभाल इत्यादी बाबतीचा जो खर्च मोठयाप्रमाणात होतो,त्यात चांगली बचत होईल. या पाण्याचा वापर नियोजनबद्ध केल्यास कारखान्याला लागणाऱ्या पाण्याची गरज पूर्णपणे भागविली जाऊ शकते.

या बाबतीतील परिपत्रक साखर आयुक्तालयाकडून सर्व साखर कारखान्यांना पाठविण्यात आले आहे अशी माहिती आयुक्तालयाकडून सांगण्यात आली आहे. साखर आयुक्त राजगापोल देवरा यांच्या माहितीनुसार काही सहकारी साखर कारखान्यांनी पाणी बचतीच्या यंत्रणा बसवून पाणी वापरात कपात केली आहे. त्यामुळे कारखान्यांचा लाखो रुपयांचा फायदा झाला आहे. पाण्यावर होणारा कोट्यावधी रुपयांचा खर्च या यंत्रणेमुळे  थांबणार आहे. खर्चातील काटकसर म्हणून हा एक उत्तम प्रयोग तर आहेच शिवाय कारखान्याला लागणारे हे प्रचंड पाणी शेतीकडे वळते करता येईल. त्यामुळे काही हेक्टर जमीन ओलिताखाली येईल. या गोष्टी व्यवस्थापनाची गरज म्हणून तर कराव्याच लागतील पण काळाची गरज म्हणून  पाणी नियोजन महत्वाचे आहे. यासाठी समाजातील कर्त्या वर्गाने  याकडे विशेष लक्ष देण्याचे प्रयत्न केल्यास सहकाराला चांगले दिवस येण्यास वेळ लागणार नाही.

**-- युवराज पाटील**

. . . .